**मंत्रिमंडळ निर्णय :** दि. ६/७/२०११

मुंबई, दि. ६ : राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आले.

## जमीन हद्द मोजणीसाठी परवानाधारक भूमापकांची नियुक्ती करणार शासनाचा महत्वपूर्ण निर्णय

राज्यात जमिनीच्या पोटहिश्श्याची व हद्दीची मोजणी करण्यासाठी खासगी परवानाधारक भूमापकांची नियुक्ती करण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाने घेतला. या निर्णयामुळे पोटहिस्सा मोजणी व हद्द मोजणीसाठी अर्ज केलेल्या लक्षावधी भूधारक व शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

पोट हिस्सा मोजणी आणि हद्द मोजणीची प्रकरणे फार मोठया संख्येने प्रलंबित आहेत. याकरिता शासनाने सन २००४ साली परवानाधारक भूमापकामार्फत पोट हिस्सा मोजणी करुन घेण्याची मूभा राहिल असा निर्णय घेतला होता. परंतु प्रत्येक प्रकरणामध्ये मेहनताना फक्त रु.६० व पोट हिस्सा मोजणी पुरतेच मर्यादित अधिकार असल्याने त्या योजनेला अल्प प्रतिसाद मिळाला. प्रलंबित प्रकरणाच्या विश्लेषणावरुन असे दिसून आले की, सुमारे ८२ टक्के प्रलंबित प्रकरणे हद्द मोजणीकरिता आहेत व १२ टक्के प्रलंबित प्रकरणे ही पोट हिस्सा मोजणीकरिता आहेत. ह्या सर्व बाबी विचारात घेऊन आज मंत्रिमंडळाने निर्णय घेतला की, परवानाधारक भूमोजणीधारकामार्फत हद्द मोजणीची प्रकरणे देखील करुन घेण्याचा विकल्प अधिकाऱ्यांना देण्यात यावा. प्रत्येक जिल्हयामध्ये प्रथम परवानाधारक भूमापकाची निवड केली जाईल. नंतर त्याना प्रशिक्षण दिले जाईल व त्यांनी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर अशा पात्र परवानाधारक भूमापकाची पात्र यादी जिल्हावार जाहीर केली जाईल.

परवानाधारक भूमापक यांना परवाना मिळण्यासाठी शैक्षणिक पात्रता सिव्हील इंजिनीयरींग डिप्लोमा किंवा आयटीआय मधून सर्व्हेअरचा डिप्लोमा अशी राहील किंवा भारतीय सर्व्हेक्षण विभागाच्या / महाराष्ट्र शासनाच्या भूमी अभिलेख विभागाच्या सेवानिवृत्त भूमापक अशा व्यक्ती परवाना मिळण्यासाठी पात्र राहतील. यांच्यासाठी किमान वयोमर्यादा २१ वर्षे व कमाल वयोमर्यादा ६५ वर्षे राहील. ज्या परवाना भूमापकधारकांना पूर्वानुभव नाही अशा नव्याने नियुक्त होणा-या परवाना भूमापकधारकाला किमान ४५ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येईल.

परवाना भूमापकधारक हे फक्त जमिनीचे सर्वेक्षण करुन आपला अहवाल भूमी अभिलेख विभागाला सादर करतील. भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी हा अहवाल तपासून मोजणीकाम प्रमाणित करतील. तसेच मोजणीसाठीचे सर्व संबंधितांना नोटीस देण्याचे अधिकार भूमी अभिलेख अधिका-याला असतील व ते अधिकारी नोटीस निर्गमित करतील. तसेच परवानाधारक भूमापकाना क्षेत्र दुरुस्तीचे ( Area Correction) अधिकार राहणार नाहीत.

शासनाकडून मोजणीसाठी ठरविण्यात आलेले दर साध्या मोजणीचे दर हे एका भूखंडासाठी दोन हेक्टर मर्यादेपर्यंत मोजणीसाठी रुपये १०००/- व पुढील प्रत्येक एक हेक्टरसाठी रुपये ५००/- असे असून परवानाधारक भूमापकास मोजणी प्रकरणात स्वीकारलेल्या मोजणी फी च्या एकूण रकमेपैकी ८० टक्के रक्कम मोबदला म्हणून मिळणार आहे व २० टक्के रक्कम शासनास मिळणार आहे.

... २

परवानाधारक भूमापक मोजणीचे अर्ज विहित फी सह स्वीकारतील, प्रत्यक्षात मोजणी करतील, मूळ भूमी अभिलेखाप्रमाणे हद्द कायम करतील व त्याचा नकाशा भूमी अभिलेख विभागाचे तालुका कार्यालयास दाखल करतील. संबंधित तालुका कार्यालय सदरचे नकाशे तपासून अंतिम करतील त्यानुसार मोजणी अर्जदारास नकाशा प्राप्त होईल.

शासनाच्या या धोरणात्मक निर्णयामुळे मोजणी प्रकरणे तात्काळ मोजणी होऊन निकाली होतील. त्याचप्रमाणे पोटहिस्साच्या कामामध्ये तातडीने मोजणी होऊन अभिलेख अद्ययावत होणार आहेत याचा परिणाम म्हणून शासकीय प्रकल्प तसेच खासगी व्यक्तींचे मोजणीच्या प्रलंबीत प्रकरणांचा जलद गतीने निपटारा होईल.

------

## नागपूर येथे न्याय सहायक विज्ञान संस्था सुरु करण्यास मान्यता

नागपूर येथे चालू वर्षीच्या शैक्षणिक वर्षापासून न्याय सहायक विज्ञान संस्था स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

अलिकडे गुन्ह्यामध्ये शास्त्र आणि तंत्रज्ञानाच्या वापराबरोबरच गुन्ह्याची क्षेत्रेसुध्दा बदललेली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने इलेक्ट्रॉनिक्स सुविधांचा वापर हा फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. डिजिटल आणि सायबर फॉरेन्सिक या माध्यमातून होणारे गुन्हे त्याचबरोबर इंटरनेट, क्रेडीट कार्डस, मोबाईल, वेबसाईट, पासवर्ड, इत्यादी हॅकिंगच्या माध्यमातून आर्थिक गुन्हे होण्याबरोबरच खोडसाळपणा शिवाय विध्वंसक कारवाया होत आहेत. यावर योग्य नियंत्रण मिळविणे यासाठी या संपूर्ण क्षेत्रामध्ये तज्ज्ञ असलेला शिक्षित प्रवर्ग उपलब्ध होण्यासाठी मुंबई व औरंगाबाद येथे सन २००९ मध्ये न्याय सहायक विज्ञान संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. त्याच धर्तीवर यावर्षीपासून नागपूर येथे न्याय सहायक विज्ञान संस्था सुरू करण्यात येत आहे.

चालू शैक्षणिक वर्षापासून नागपूर येथील शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्थेत पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यात येतील.

प्रथम ही संस्था विज्ञान संस्था, नागपूर यांच्या इमारतीत सुरु करण्यात येईल आणि कालांतराने स्वत:च्या इमारतीत संस्थेचे स्थलांतर होईल. ही संस्था सुरु करण्यासाठी सन २०११-१२ साठी आवर्ती खर्च २.५ कोटी रुपये आणि अनावर्ती खर्च २.८५ कोटी रुपये तसेच पहिल्या ५ वर्षासाठी योजनांतर्गत तरतुदीतून खर्च करण्यास मान्यता देण्यात आली.

या संस्थेसाठी ६५ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. संस्था स्थापनेसाठीचा सल्लागार कक्ष पूर्वीचाच राहील. यावेळी सल्लागार गट स्थापनेस मान्यता देण्यात आली.

न्याय सहायक विज्ञान पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास विद्यापीठांना मंजुरी कळविण्यास व या संस्था ज्या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात आहेत, त्या विद्यापीठाशी संलग्नित करण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया करावी आणि या संस्थांमध्ये राबविण्यात येणारा अभ्यासक्रम सारखाच असावा असेही निदेश मंत्रिमंडळाने दिले.

------

## मुंबईतील कामा व आल्बेस रुग्णालयात २३ नवीन पदे

मुंबईतील कामा व आल्बेस रुग्णालयात २३ नवीन पदे निर्माण करण्यास व ९ पदे बाह्यस्रोतामार्फत भरण्यास मंजुरी देण्यात आली.

... ३

**मंत्रिमंडळ निर्णय : . . ३/-**

कामा व आल्बेस रुग्णालयाच्या रेडिओथेरपी विभागामध्ये स्त्रियांच्या स्तनाच्या व गर्भाशयाच्या कर्करोगावर दररोज सरासरी ५० ते ७० रुग्ण उपचार घेत असतात. या संस्थेमधील सेवा सुरळीत चालावी आणि अत्याधुनिक यंत्रणेद्वारे जास्त रुग्णांना चांगली सेवा उपलब्ध करून देता यावी यादृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

नवीन निर्माण करण्यात येणाऱ्या पदांमध्ये सहयोगी प्राध्यापक-१, अधिव्याख्याता (रेडिओथेरपी) - २, भौतिकशास्त्र सेवा - २, तंत्रज्ञ रेडिओथेरपी - ४, अधिपरिचारिका - ३, वरिष्ठ निवासी - २, कनिष्ठ निवासी (१) - १, कनिष्ठ निवासी (२) - १, कनिष्ठ निवासी (३) - १, लिपिक टंकलेखक - २, सामाजिक कार्यकर्ता - १, सहाय्यक प्राध्यापक - १, सि.टी. तंत्रज्ञ - २, या पदांचा समावेश असून बाह्यस्त्रोतामार्फत भरण्यात येणाऱ्या पदांमध्ये कक्षसेवक - ३, आया - ३ आणि सफाईगार - ३ या पदांचा समावेश आहे.

वरील पदनिर्मितीमुळे शासनास दरवर्षी सुमारे ८८ लाख रुपये एवढा खर्च अपेक्षित आहे.

०००० 

## राज्यात सरासरी २७२.५ मि.मीटर पाऊस
## आतापर्यंत २८.२६ लाख हेक्टर क्षेत्रात पेरणी

राज्यात मोसमी पावसाचे सर्वत्र आगमन झाले असून कोकण विभाग, पुणे, सातारा आणि कोल्हापूर विभाग वगळता इतर ठिकाणी पावसाची तीव्रता कमी आहे. राज्यातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यात १२० टक्क्यांपेक्षा तर पुणे जिल्ह्यात सरासरी १०० टक्क्यांहून अधिक पावसाची नोंद झाली आहे. रायगड, सांगली, हिंगोली, यवतमाळ या ४ जिल्ह्यात ८० टक्के तर ठाणे, अकोला, वाशिम, अमरावती, वर्धा, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या ९ जिल्ह्यात ६० ते ८० टक्के पाऊस झाला आहे. नाशिक, नंदूरबार, अहमदनगर, बीड, नांदेड, परभणी, भंडारा या ७ जिल्ह्यात ४० ते ६० टक्के तर धुळे, जळगाव, सोलापूर, औरंगाबाद, जालना, लातूर, उस्मानाबाद आणि बुलढाणा या ८ जिल्ह्यात ८० टक्क्यांपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे.

राज्यातील एकूण ३५५ तालुक्यांपैकी २२ तालुक्यात २० टक्क्यापेक्षा कमी, ७८ तालुक्यात २० ते ४० टक्के, ७९ तालुक्यात ४० ते ६० टक्के, ६७ तालुक्यात ६० ते ८० टक्के, ४७ तालुक्यात ८० ते १०० टक्के आणि उर्वरित ६२ तालुक्यात १०० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस झाला आहे.

**राज्यात २१ टक्के क्षेत्रात पेरणी :**

राज्यातील खरीप पिकाचे सरासरी क्षेत्र १३२.३४ लाख हेक्टर असून आतापर्यंत २८.२६ लाख हेक्टर म्हणजेच एकूण क्षेत्राच्या २१ टक्के क्षेत्रात पेरणी झाली आहे.

कोकण, कोल्हापूर आणि पुणे विभागात भात रोपवाटिकेवर रोपे टाकण्याचे काम पूर्ण झाले असून रोपे वाढीच्या अवस्थेत आहेत. कोकण विभागात भात पिकाची पुनर्लागवड सुरु आहे. कोल्हापूर विभागात भात, सोयाबीन, भुईमूग आणि ज्वारी पिकांच्या पेरण्या प्रगतीपथावर आहेत.

नाशिक, लातूर, औरंगाबाद आणि पुणे विभागात पुरेशा पावसाअभावी खरीप पिकाच्या पेरण्या खोळंबल्या आहेत.

चालू वर्षी ४६.३५ लाख मेट्रिक टन खताची केंद्र शासनाकडे मागणी केली होती. प्रत्यक्षात ४३ लाख मेट्रिक टन खत साठा मंजूर करण्यात आला. सध्या खताची पुरेशी उपलब्धता आहे.

एकूण बियाण्यांची गरज १८.३५ लाख क्विंटल असून एकूण उपलब्धता २०.५७ लाख क्विंटल आहे. आतापर्यंत १६.७६ लाख क्विंटल बियाण्यांचा पुरवठा झाला आहे.

०००० 